पुस्तकांशी मैत्री करुन चिमुकल्यांचे अद्भुत जगात मनसोक्त भ्रमण ! >> पान 2
वृत्तपत्रविक्रेत्यांना न्याय देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य >> पान 3
मेहकर येथे रावण दहनाची जय्यत तयारी ; २५ फूट रावणाच्या प्रतिकृतीचे होणार दहन >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



लपवण्यासारखं काही नाही...; नम्रता-महेश बाबूसोबतच्या नात्यावर शिल्पाने सोडलं मौन
आतील पान

सुविचार
कर्तव्याची दोरी नसली की मनाचा पतंग कुठेही फडफडत राहतो.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 65 ■ शुक्रवार, दि. 11 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# उद्योगपती रतन टाटा अनंतात विलीन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय उद्योग जगताचे पितामह रतन टाटा यांचे बुधवारी (दि.१०) मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. आज त्यांच्यावर वरळीतील पारसी स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रार्थना सभागृहात पारसी पद्धतीने त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, रतन टाटा यांचे निधन झाल्यानंतर मुंबई पोलिसांकडून त्यांना मानवंदना देण्यात आली. ब्रीचकँडी रुग्णालयात निधन झाल्यानंतर रतन टाटा यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे पार्थीव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या एनसीपीएमध्ये सकाळी १० ते दुपारी चार पर्यंत ठेवण्यात आले होते. यावेळी रतन टाटा विविध धर्मातील धर्मगुरुंनी अंत्यदर्शन घेतले. टाटांच्या अंत्यदर्शनासाठी आलेल्या अनेकांचा अश्रूंचा बांध फुटलेला पाहायला मिळाला.

राजकीय, मनोरंजन आणि सर्वच क्षेत्रातील लोकांनी मुंबईत रतन टाटा यांच्या अंत्यदर्शनासाठी दाखल झाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार या सर्वांनी रतन टाटा यांचे अंत्यदर्शन घेतले. भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, दिग्दर्शक मधू भांडारकर, ईशा अंबानी, आनंद पिरामल यांनी देखील रतन टाटा यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली वाहिली.

उद्योगपती रतन टाटा यांचे निधन झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि.१०) एक दिवसाचा दुखवटा पाळण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. भारतीय उद्योग जगताचे पितामह रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे राज्यात आज शासकीय कार्यालयांवरिल ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले होते. त्याशिवाय मनोरंजन आणि करमणुकीचे कार्यक्रम देखील आज होणार नसल्याचे जाहीर करण्यात आले होते.



राज ठाकरे पीएम मोदींना लिहिलेल्या पत्रात म्हणाले, ज्येष्ठ उद्योगपती आणि गेल्या ३ दशकांत भारतीय उद्योगजगताला आकार देणारे रतन टाटा यांचं निधन झालं. रतन टाटांना तुम्ही पण जवळून ओळखायचात, आणि त्यातून तुमच्याही लक्षात आलं असेल की, कुठल्याही मानसन्मानाची अपेक्षा न ठेवणारी व्यक्ती होती. पण भारतीय उद्योगजगाला, भारतीय अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेलं योगदान आणि त्याहून महत्वाचं माणूस म्हणून जे त्यांचं मोठेपण आहे, ते अफाट होतं. अशा व्यक्तीला खरंतर ते हयात असतानाच 'भारतरत्न'सारख्या सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित करायला हवं होतं. पण आता किमान त्यांना मरणोत्तर भारतरत्न घोषित व्हायला हवी अशी माझी आणि माझ्या पक्षाची इच्छा आणि अपेक्षा आहे , तसच तमाम भारतीयांची देखील याहून काही वेगळी अपेक्षा असेल असं मला वाटत नाही !

# कॅबिनेटच्या बैठकीत विक्रमी ८० निर्णय

## ■ नॉन क्रिमिलेयरची मर्यादा ८ वरुन १५ लाख ■ पत्रकारांसाठी महामंडळ ■ मराठा आरक्षणाला बगल



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकांची बिगुल पुढील आठवड्यात वाजण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी आज महायुती सरकारच्या व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक आज संपन्न झाली. याबैठकीत जवळपास ८० निर्णय घेण्यात आले असून काही नव्याने महामंडळ स्थापन करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामध्ये, संत गोरोबा कुंभार महामंडळ व कोळी समाज महामंडळाचा प्रस्ताव मागवण्यात आल्याची माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. तसेच, मंत्रिमंडळाची आजची बैठक रेकॉर्ड ब्रेक झाल्याचंही त्यांनी सांगितलं.**

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शिक्षकांचा विषय घेण्यात आला आहे, जो शिक्षणमंत्री सांगतील. त्यासोबतच, आजच्या कॅबिनेटमध्ये लेवा पाटील समाज महामंडळाला मंजुरी देण्यात आली आहे. पत्रकारांसाठी आणि वृतपत्र विक्रेते यांच्यासाठी दोन स्वतंत्र महामंडळासही कॅबिनेट बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. तर, ओबीसी नॉन क्रिमीलेयरचा उत्पन्न टप्पा १५ लाखांपर्यंत नेण्यात येत आहे, त्यासाठीचा प्रस्ताव केंद्राकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. दरम्यान, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून ते प्रसिद्ध पत्रक रद्द करण्यात आल्याची माहिती गुलाबराव पाटील यांनी दिली. मात्र, आजच्या बैठकीत मराठा आरक्षणाचा विषय घेण्यात आला नव्हता, अशी देखील माहिती पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत अतिशय महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. आर्थिक विकास महामंडळाचा निर्णय घेण्यात आला, विशेष करून मराठवाड्यातील समाज आहेत, गुजर समाज, लेवा पाटील समाज आहे, मोठ्या प्रमाणात गुजर समाजात गरिबी आहे. तसेच, लेवा पाटील समाज महामंडळ करण्यात आले आहे, त्या समाजात गरीब माणसे आहेत, त्यांना मदत करण्यासाठी महामंडळांचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. फायदा तोटा हा भाग नाही पण सामान्य लोकांन याचा फायदा होईल. एक चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. कोणाला खुश करण्यासाठी नाही, तर वस्तुस्थिती पाहून हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात यावा, असा प्रस्ताव पाठवला आहे, असेही गिरीश महाजन यांनी सांगितले.

उद्योगपती रतन टाटा यांना जो उद्योगरत्न पुरस्कार देण्यात आला होता, तो यापुढे रतन टाटा यांच्या नावाने देण्यात येईल, असा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच, मुंबई येथे जे उद्योग भवन बनत आहे, त्यालाही रतन टाटा यांचे नाव देण्यात येणार आहे. ठाणे रत्नागिरी आदी कामासाठी सीएसआरमधून ५०० कोटी रुपये त्यानी दिले होते, नवीन उद्योग भवन हे ७०० कोटींचे होत आहे, याला नाव देऊन एक प्रकारे शासकीय श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. मला शालेय जीवनापासून वाटायचे की रतन टाटा याना भेटाव, पण गेल्यावर्षी जो पुरस्कार जाहीर झालं, त्याचे पत्र देण्यासाठी मी गेलो होतो, असे उदय सामंत यांनी सांगितले.





# निवडणुकांपूर्वी कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा

➤ याचिकेवर सुनावणी तहकूब
➤ राज्य सरकारला दिलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्र्न अद्यापही कायम असून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची मागणी पूर्ण न झाल्याने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील अधिक आक्रमक झाले आहेत. एकीकडे राज्यातील १५ जातींचा ओबीसीमध्ये समावेश करण्याची शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. मात्र, मराठा समाजाच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार व ओबीसी नेत्यांवर तोफ डागली. तर, मराठा समाजाला राज्य सरकारने स्वतंत्रपणे १० टक्के आरक्षण दिलं असून ते आरक्षण कोर्टात टिकेल, असा विश्र्वास राज्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

दुसरीकडे मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरूवात केली होती. त्यावर, आक्षेप घेत >> पान २





# राज्य मंत्रिमंडळाची ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांना श्रद्धांजली

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडला शोकप्रस्ताव
## रतन टाटा यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्ताव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा शोकप्रस्ताव बैठकीत मांडला. यावेळी रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला.

या शोकप्रस्तावात म्हटले आहे की, उद्यमशीलता हा देखील समाज उभारणीचा प्रभावी मार्ग असतो. नवनवीन उद्योगांच्या उभारणीनेच देश प्रगतीपथावर नेता येतो, मात्र त्यासाठी हृदयात निस्सीम देशप्रेम आणि आपल्या समाजाप्रती तितकाच प्रामाणिक कळवळा हवा. रतन टाटा यांच्या रुपाने आपण अशाच विचारांचा एक समाजसेवी, द्रष्टा आणि देशप्रेमी मार्गदर्शक गमावला. भारताच्या उद्योगक्षेत्रातच नव्हे, तर समाजउभारणीच्या कामातही श्री. टाटा यांचे योगदान अपूर्व होते. ते महाराष्ट्राचे सुपुत्र होते. भारताचा अभिमान होते. स्वयंशिस्त, स्वच्छ कारभार आणि मोठमोठे उद्योग सांभाळताना पाळलेली उच्च प्रतीची नैतिक मूल्ये या कठोर कसोट्या पार पाडत श्री. टाटा यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला आणि भारताचाही ठसा उमटवला. त्यांच्या रुपाने देशाचा एक प्रमुख आधारस्तंभ कोसळला आहे.टाटा समुहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पणतू होते. टाटा समुहाचे अध्यक्ष म्हणून आणि नंतर अंतरिम अध्यक्ष म्हणून या समुहाचा कारभार अनेक वर्ष पाहिला. देशातल्या सर्वात जुन्या अशा टाटा समुहाच्या चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख म्हणून अतिशय परोपकारी वृत्तीने त्यांनी काम पाहिलं.

श्री. टाटा यांनी नैतिक मूल्यांची जी जपणूक केली, ती इतर उद्योजकांसाठी आणि उद्योगविश्र्वातील भावी पिढ्यांसाठीही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतील. ते तत्त्वनिष्ठ कर्मयोगी होते. स्वातंत्र्यानंतर देशाची पुन्हा उभारणीत टाटा समूहाचा वाटा सिंहाचा होता. या समूहाच्या माध्यमातून रतन टाटा यांनी भारताचा झेंडा जागतिक पातळीवर दिमाखाने फडकता ठेवला.

मोटारीपासून मिठापर्यंत आणि संगणकापासून कॉफी-चहापर्यंत असंख्य उत्पादनांशी टाटा हे नाव अभिमानाने जोडले जाते. शिक्षण, आरोग्य आणि



समाजसेवेच्या क्षेत्रातही रतन टाटा यांनी आपले अनन्यसाधारण योगदान दिले. मुंबईवर झालेल्या २६/११ च्या हल्ल्यानंतर त्यांनी दाखवलेला खंबीरपणा स्मरणात राहणार आहे. कोविडकाळात रतन टाटा यांनी प्रधानमंत्री सहाय्य निधीसाठी तत्काळ १५०० कोटी रुपये दिले. तसेच कोविडकाळात रुग्णांसाठी त्यांची बहुतांश हॉटेलही उपलब्ध करून दिली. हा त्यांचा मोठेपणा कायम लक्षात राहणारा आहे.

नवनिर्मिती आणि दानशूरता यांचा अपूर्व संगम त्यांच्या ठायी होता. त्यांनी कधीही आपल्या 'टाटा मूल्यां' शी तडजोड केली नाही. तरुणांमधील कर्तृत्वाला, प्रयोगशिलतेला प्रोत्साहन देण्यात ते कायम आघाडीवर होते. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात तरुणांच्या कौशल्याला वाव आणि रोजगाराची संधी देण्यासाठी त्यांनी इनोव्हेशन सेंटर सुरू केलं.

महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योग रत्न' हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचं भाग्य आपल्याला लाभलं. त्यांच्या मार्गदर्शनाचा महाराष्ट्राला सदैव लाभ झाला. रतन टाटा यांच्या निधनाने आपला देश आणि महाराष्ट्राचेही कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आहे.

टाटा समूहाच्या विशाल परिवाराच्या दुःखात मंत्रिमंडळ सहभागी आहे. त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो, ही प्रार्थना. देशाच्या या महान सुपुत्राला महाराष्ट्रातील तमाम नागरिकांच्या वतीने राज्य मंत्रिमंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली

## महानायकाचा वाढदिवस

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्र्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्र्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्र्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८२ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्र्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# पुस्तकांशी मैत्री करून चिमुकल्यांचे अद्भुत जगात मनसोक्त भ्रमण !

## दिग्रस येथील अंजुमन शाळेतील उपक्रम ग्रंथप्रदर्शनीला लाभले उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**दिग्रस :** पुस्तकांमधील अक्षरांवर स्वार होऊन चिमुकल्यांनी स्वप्नलोकाची सैर करून मनसोक्त आनंद घेतला. राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर, जॉर्ज वाशिंग्टन कारव्हर, मार्टिन ल्यूथर किंग, पक्षीतज्ञ डॉ सालिम अली, लिओ टॉलस्टॉय, साने गुरुजी, मिर्जा गालिब, डॉ अल्लामा इकबाल, किशोर शांताबाई काळे, डॉ एपीजे अब्दुल कलाम, मुन्शी प्रेमचंद, ऑस्कर वाईल्ड, ख्वाजा अहेमद अब्बास, अल्ताफ हुसैन हाली, सर सैयद अहेमद खान, मौलाना अबुल कलाम आझाद, --- आदी थोर महापुरुषांशी स्वप्नलोकात त्यांची भेट झाली असून त्यांच्या सोबत हितगूज करण्याची संधी देखील त्यांना मिळाली.

निमित्त होते स्थानिक अंजुमन उर्दू विद्यालयात आयोजित ग्रंथप्रदर्शनीचे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे ज्ञानवृद्धी, तसेच विचारांची क्षितिजे विस्तारित करण्यासाठी व वाचन संस्कृती समृद्ध करण्यासाठी महावाचन उत्सव - २०२४ हा उपक्रम राबविण्यात आला. यात विविध स्तरावर भरपूर रोख बक्षिसे देखील ठेवण्यात आली होती.

अंजुमन उर्दू विद्यालयात देखील सदर उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपक्रमशील शिक्षक मजहर अहेमद खान यांच्याकडील पुस्तकांची प्रदर्शनी देखील शाळेत आयोजित करण्यात आली होती. शाळा किंवा वर्गातील पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके पाहण्याची बऱ्याच चिमुकल्यांची ही जीवनातील पहिलीच वेळ असल्याचे अनेकांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी घरी पुस्तके नेऊन त्याचे सविस्तरपणे वाचन केले. वचनाद्वारे दुर्मिळ माहिती तर मिळालीच, सोबतच अनेक थोर पुरुषांचे संघर्षपूर्ण बालपण व खडतर जीवन प्रवास, संकटे, जिद्द, चिकाटी, सातत्य, विनम्रता, साधी राहणी असे अनेक गुण शिकायला मिळाल्याची बोलकी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

आठव्या वर्गातील नरमीन अंजुम, सिदरा सिद्दीका, सुहाना परवीन, उरुज फातेमा, बरीरा फातेमा, नवव्या वर्गातील रोजिया बानो, हनिफा अशर , शारिया सानी, इनाया सहर , बुशरा परवीन, तसेच दहाव्या वर्गातील रुमैसा खान, तनजिया कौसर, सादिया सदफ, हुरैन फातेमा, आईशा परवीन, उम्मे कुलसुम आदी विद्यार्थ्यांनी तर दिलेल्या पुस्तकांचे सखोल वाचन करून त्यावर आपल्या मौखिक व लेखीस्वरूपातील प्रतिक्रिया देखील मांडल्या.

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात वाचन संस्कृतीपासून पिढया दूर जात आहे . मात्र पुस्तके वाचून एका वेगळ्या जगात पोहोचल्याचा अनुभव आपणास आल्याचे देखील काही विद्यार्थ्यांनी सांगितले. काहींना स्वप्नलोकाचा हा प्रवास अद्भूत, अविस्मरणीय व रंजक वाटला. मुख्याध्यापक सोहेल जावेद, पर्यवेक्षक उजमा खानसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतला.



# लपवण्यासारखं काही नाही...; नम्रता-महेश बाबूसोबतच्या नात्यावर शिल्पाने सोडलं मौन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची नव्वदच्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री नम्रता शिरोडकरची बहीण शिल्पा शिरोडकर बिग बॉस १८ मध्ये सहभागी झाली आहे. नम्रता शिरोडकर आणि महेश बाबू यांनी तिच्या सहभागाबद्दल जाहीरपणे प्रतिक्रिया दिलेली नाही. पण बिग बॉस १८ मध्ये येण्याआधी शिल्पाने एका मुलाखतीत नम्रता आणि महेश तिला बिग बॉसमध्ये पाहण्यासाठी उत्सुक आहेत असा खुलासा केला होता. शिल्पा बहिण आणि मेहुण्याविषयी काय म्हणाली?

बिग बॉसमध्ये येण्याआधी टाईम्स ऑफ इंडियाशी बोलताना शिल्पा म्हणाली होती, ते दोघे माझ्यासाठी खूप आनंदी आहेत. त्यांना माझा खूप अभिमान आहे. मी जे काही करेन ते मी स्वतः करेन. मला माहित आहे की मला त्यांचा खूप अभिमान वाटेल. फॅमिली म्हणून आम्ही एकमेकांच्या खूप जवळ आहोत. त्यांचा मला पाठिंबा आहे.

शिल्पाने नम्रता आणि महेशबद्दल बोलण्यास नकार दिल्याचं वृत्त इंडिया टुडेच्या एका दिवसानंतर ही मुलाखत समोर आली. शिल्पाने 'तिची बहीण नम्रता शिरोडकर आणि मेव्हणा महेश बाबूबद्दल बोलण्यास नकार दिला,' असं त्यांनी म्हटलं होतं.

शिल्पा म्हणाली, शोमध्ये लपवण्यासारखं तिच्याकडे काहीही नाही. माझ्याकडे कोणतेही सिक्रेच नाहीत आणि म्हणून मला सावध किंवा प्रतिमा-जागरूक राहण्याची आवश्यकता नाही. मी स्वतः असेन आणि मनापासून खेळ खेळेन

शिल्पा आणि सलमान खान यांनी एकत्र अनेक चित्रपटात काम केलं आहे. दोघेही अनेक वर्षांपासून एकमेकांचे चांगले मित्र आहेत. शिल्पाने किशन कन्हैया, खुदा गवाह, गोपी किशन, बेवफा सनम आणि रिटर्न ऑफ ज्वेल थीफ यासारख्या चित्रपटांमध्ये ती दिसली होती. दुसरीकडे नम्रताने जब प्यार किसीसे होता है या चित्रपटात सलमान खानसोबत काम केले आहे. नम्रता आणि सलमान एकमेकांना ओळखतात पण ते एकमेकांचे मित्र नाहीत.

याबिग बॉस १८ मध्ये शिल्पा शिरोडकरबरोबर नायरा बॅनर्जी, अविनाश मिश्रा, विवियन डिसेना, शेहजादा धामी, गुणरत्न सदावर्ते, सारा अरफीन खान, अरफीन खान, रजत दलाल, श्रुतिका अर्जुन राज, चाहत पांडे, लिस कौशिक, हेमा शर्मा उर्फ विरल भाभी, तजिंदर बग्गा, छिंदम बग्गा यांच्याशी होईल. ट्रॉफीसाठी ईशा सिंग, करणवीर मेहरा आणि मुस्कान बमने हे सदस्य आहेत.

# रतन टाटांचा वारसदार कोण असणार? टाटा घराण्यातील तिघांची नावं चर्चेत, सर्वात पुढं कुणाचं नाव?

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील उद्योगविश्वाचे शिल्पकार आणि टाटा ग्रुपचे प्रमुख रतन टाटा यांचं बुधवारी (९ ऑक्टोबर २०२४) रात्री निधन झालं. रतन टाटा यांचं वय ८६ वर्ष होतं. रतन टाटा यांनी उद्योगविश्वासह देशभरात सामाजिक उपक्रमांना हातभार लावला. टाटा ट्रस्टच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रातील काम ासाठी रतन टाटांनी मदत केली. रतन टाटा यांनी लग्न केलं नव्हतं रतन टाटा यांच्या निधनानंतर त्यांच्या टाटा सन्सचा वारसरदार कोण असणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. यासंदर्भातील चर्चा सुरु आहेत.

रतन टाटा यांच्या निधनानंतर त्यांच्या उद्योगांची जबाबदारी कोणाकडे येणार हे जाणून घेण्यासाठी टाटांच्या कुटुंबाविषयी माहिती जाणून घेणं महत्त्वाचं आहे. रतन टाटा यांच्या वडिलांचं नाव नवल टाटा तर आईचं नाव सोनी टाटा होतं. १९४० च्या दशकात नवल टाटा आणि सोनी टाटा यांच्यात घटस्फोट झाला. त्यानंतर नवल टाटा यांनी सिमोन यांच्याशी लग्न केलं. या दोघांच्या मुलाचं नाव नोएल टाटा आहे. रतन टाटा यांचे ते सावत्र भाऊ आहेत. त्यामुळं रतन टाटा यांचं साम्राज्य नोएल टाटा यांच्या नातेवाईकांकडे जाण्याची शक्यता आहे. नोएल टाटा यांना तीन मुलं असून त्यांची नावं म ाया, नेविल लिआ टाटा अशी आहेत.

नोएल टाटा यांची मुलगी माया टाटा यांच्याकडे रतन टाटांची संपत्ती जाण्याची शक्यता आहे. माया टाटा यांचं वय ३४ वर्ष असून बेयस बिझनेस स्कूल आणि वारविक विद्यापीठातून त्यांनी पदवी मिळवली आहे. टाटा अपॉर्च्यूनिटी फंड पासून करिअर सुरु केलं, त्यानंतर त्या टाटा डिजिटलमध्ये गेल्या. तिथं त्यांनी ऊरूर नल हे ॲप विकसित आणि लाँच करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या त्या टाटा मेडिकल ट्र्स्टच्या बोर्डामध्ये त्यांच्या भाऊ आणि बहिणींसह काम करतात. माया टाटा यांची आई टाटा ग्रुपचे माजी चेअरमन सायरस मिस्त्री यांची बहीण आणि दिवंगत उद्योगपती पालोनजी मिस्त्री यांची मुलगी आहे.

नेविल टाटा

माया टाटाचा भाऊ नेविल टाटा (३२ वर्ष) कोंटुबिक उद्योग पाहतात. रतन टाटा यांच्या साम्राज्याचे वारसदार म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. नेविल टाटा यांचं लग्न टोयोटा किर्लोस्कर ग्रुपच्या उत्तराधिकारी मानसी किर्लोस्कर यांच्यासोबत झालं आहे.या दोघांना एक म ुलगा असून त्याचं नाव जमशेद टाटा आहे. नेविल टाटा स्टार बाजारचं नेतृत्त्व करतात. ट्रेंट लिमिटेडच्या अंतर्गत हायपरम ार्केटमध्ये कार्यरत आहेत नेविल यांना पहिल्यांदा पॅकिंग अन्न पदार्थ आणि बेवरेज विभागाचं व्यवस्थापन सोपवण्यात आलं होतं. यामध्ये त्यांनी यश मि ळवल्यानंतर झडियो आणि वेस्टसाईडचं कामकाद देखील सोपवण्यात आलं आहे.

## वांद्रे शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा देणार

**मुंबई/प्रतिनिधी :**वांद्रे शासकीय वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती ही जागेबाबतची निश्र्चित करणे, सदस्य संख्या निश्र्चित करणे तसेच इतर कार्यपद्धती ठरवणे याबाबत निर्णय घेईल.

## कात्रज कोंढवा उड्डाणपूलास बाळासाहेब देवरस यांचे नाव

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यातील कात्रज कोंढवा राष्ट्रीय महामार्गावरील भुयारी मार्गास व उड्डाणपूलास सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे नाव देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या संदर्भात पुणे वैद्यकीय सेवा व संशोधन प्रतिष्ठान यांनी विनंती केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेने हा प्रस्ताव दिला होता. या प्रतिष्ठानच्यावतीने कात्रज कोंढवा रस्त्यावरील खडी मशिन चौकातून ऊंड्री -पिसोळी रस्त्यावर बाळासाहेब देवरस एक हजार खाटांचे नियोजित रुग्णालय उभारणी सुरु आहे. त्यामुळे या चौकाला व भुयारी मार्गाला बाळासाहेब देवरस यांची नाव देण्याची विनंती होती. त्यानुसार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे नाव देण्यास मान्यता देण्यात आली.

## सावनेर, गोंदिया, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर, लातूरच्या जलसंपदाच्या कामांना मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :**सावनेर, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर, लातूरच्या विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. निम्न तेरणा उपसा सिंचन योजना पंपगृहाची दूरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. वैनगंगा नदीवरील गोंदिया तालुक्यातील डांगुर्ली उच्च पातळी बंधारा येथील तेढवा शिवनी, तसेच डांगुर्ली व नवेगांव देवरी उपसा सिंचन योजनांचे बळकटीकरण करण्यात येईल. तसेच सावनेर तालुक्यातील कन्हान नदी योजनेस मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे राजापूर तालुक्यातील अर्जूना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या कामास सुधारित मंजूरी देण्यात आली. राजापूर तालुक्यातील जामदा नदीवरील जामदा मध्यम प्रकल्पास त्याचप्रमाणे कणकवली तालुक्यातील तरंदळे लघु पाटबंधारे योजनेस, अंबरनाथ तालुक्यातील कुशीवली लघु पाटबंधारे योजनांना देखील मान्यता देण्यात आल्याने, अनेक गांवातील क्षेत्र सिंचित होण्यास मदत होईल.

## वाचन संस्कृती, ग्रंथ चळवळ विकसित करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात वाचन संस्कृती, ग्रंथ चळवळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामध्ये ग्रंथांच्या व्याख्येत, ई-संसधाने, ई-बुक, ई-नियतकालिके, ई-डाटा बेस यांचा समावेश करण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव व माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक यांना राज्य ग्रंथालय परिषदेवर सदस्य म्हणून घेण्यात येईल. याशिवाय परिषदेचे काम परिणामकारक व्हावे म्हणून उपसमित्यांची रचना देखील केली जाईल.

## नवीन महाविद्यालयांसाठी अर्जाची मुदत वाढवली

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सुरु होणाऱ्या नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यासक्रम तसेच अतिरिक्त तुकड्यांसाठी अर्ज करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. विद्यापीठांच्या कुलसचिवांकडे अर्ज करण्याची मुदत सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत होती. ती आता वाढवून ३१ ऑक्टोबरपर्यंत विहीत नमुन्यात अर्ज करता येतील. याशिवाय अथर्व विद्यापीठ मुंबई, इंदिरा विद्यापीठ पुणे व नयनता विद्यापीठ पुणे या विद्यापीठांच्या नावांचा समावेश अनुसूचीमध्ये करण्यास मान्यता देण्यात आली.

पान १ वरून...

## निवडणुकांपूर्वी कुणबी प्रमाणपत्र

न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावरील, सुनावणी आता ४ आठवड्यांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे, विधानसभा निवडणुकांपूर्वी कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने कुणबीच्या नोंदी आढळून आलेल्या मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. मात्र, सरकारच्या या प्रमाणपत्र वाटपास विरोध करत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे, ऐन विधानसभा निवडणुकांपूर्वीच राज्य सरकारची गोची झाली होती. पण, आता मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा राज्य सरकारचा मार्ग तूर्तास मोकळा झाला आहे. कारण, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेविरोधातील याचिका चार आठवड्यांसाठी तहकूब करण्यात आली आहे. त्यामुळे, आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्र्वभूमीवर राज्य सरकारला मोठा दिलासा मानला जात आहे.

राज्य सरकारनं २६ जानेवारी २०२४ रोजी कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेत मराठ्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊ नका तसेच मराठ्यांना दिलेलं कुणबी प्रमाणपत्र स्थगित करा, अशी प्रमुख मागणी करत मंगेश ससाणे यांच्याकडून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. आता, या याचिकेवर महिनाभर सुनावणी होणार नाही. त्यामुळे, विधानसभा निवडणुकांपूर्वी राज्य सरकारला हा मोठा दिलासा असून कुणबी प्रमाणपत्र देण्यास सध्यातरी कुठलीही अडचण नाही.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लाडकी बहीण योजनेचे पैसे काढण्यासाठी पोस्ट ऑफिस मध्ये महिलांची झुंबड



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा झाल्याने महिलांनी पैसे काढण्यासाठी पोस्ट ऑफिस मध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. नाशिकच्या एन डी पाटील रोड येथील पोस्ट ऑफिस मध्ये महिलांनी पहाटे पाच वाजेपासूनच गर्दी केली केली आहे. अनेक महिलांनी बँकेत खाते उघडले मात्र त्यात पैसे जमा झाले नाही यामुळे पोस्टात खाते उघडल्यानंतर त्वरित पैसे येत असल्याचे कळताच महिलांनी खाते उघडण्यासाठी आणि योजनेचे पैसे घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे पोस्ट ऑफिस मधील कर्मचाऱ्यांवर याचा ताण पडत असून जिल्हा प्रशासनाने या ठिकाणी इतर व्यवस्था करावी अशी मागणी पोस्टातील कर्मचाऱ्यांनी केली आहे. सकाळपासून रांगेत उभे राहिल्याने अनेक महिलांना चक्कर येत असून या ठिकाणी योग्य त्या सुविधा पुरविण्यात याव्या अशी मागणी होत आहे मात्र महिलांनी कुठल्याही अफवांना बळी पडू नये खात्यातील पैसे कुठेच जाणार नाही असे आवाहन सिनियर पोस्ट ऑफिसर संदीप देसले यांनी केले आहे.

### तेलंगणा येथील महिलांचा बतक्कमा सण भिवंडीत उत्साहात साजरा, मोठ्या संख्येने महिलांचा सहभाग



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** नवरात्रौत्सवात अश्विन शुक्ल अष्टमीच्या दिवशी तेलंगणा,आंध्र प्रदेश येथील महिलांचा बतक्कमा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. मूळ तेलंगणा आंध्र प्रदेश येथील निवासी असलेला मुख्यता विणकर पद्मशाली समाज यंत्रमाग उद्योग नागरी मुळे भिवंडीत मोठ्या संख्येने स्थायिक झालेला असून या समाजातील महिलांनी बतक्कमा सण मोठ्या उत्साहात साजरा केला असून .भिवंडी शहरात पद्मा नगर येथे सायंकाळी उशिरा असंख्य महिला बतक्कमा सण साजरा करण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. बतक्कमा सण हा दक्षिण भारतातील तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यात नवरात्री काळात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ताटात अनेक प्रकारचे रंगीबेरंगी फुले सजवून अंगणात ठेवून त्या भोवती महिला,युवती फेर धरून पारंपारीक गाणी म्हणत नृत्य करीत आनंद साजरा करीत असतात.व त्या नंतर उशिरा तलावात ही फुले विसर्जित करण्यात येतात.

### श्री तुळजाभवानी देवीची आज भवानी तलवार महालंकार पूजा



दैनिक आपला विदर्भ

**तुळजापूर/प्रतिनिधी :**शारदीय नवरात्र महोत्सवाचा आज १० ऑक्टोबर रोजी गुरुवारी आठव्या माळेच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीची भवानी तलवार रुपात अलंकार महापूजा मांडण्यात आली. श्री तुळजाभवानी देवीजींच्या आज नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली.श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना धर्म रक्षणासाठी श्री तुळजाभवानी मातेने प्रसन्न होऊन आपल्या हाताने भवानी तलवार देऊन आर्शीर्वाद दिला म्हणून या दिवशी देवीला महाअलंकार घालण्यात येऊन छत्रपती भवानी तलवार देत आहे,ही अवतार पूजा मांडण्यात येते.

### सिडको व पीएमआरडीएस दिलेले भूखंड गृहनिर्माण संस्थाच्या मालकीचे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरीत करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या निर्णयामुळे अनेक गृहनिर्माण संस्था या जागेच्या मालक होणार असून, त्यांना नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.नागरिकांना सोयीचे व्हावे म्हणून शासनाने हे भूखंड एकरकमी विहीत शुल्क आकारून भाडेपट्ट्यांऐवजी कब्जे हक्काने वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

# वृत्तपत्रविक्रेत्यांना न्याय देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

## आमदार संजय केळकर यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे /प्रतिनिधी :** लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ वृत्तपत्र असला तरी त्याचा पाठीराखा हा वृत्तपत्र विक्रेता आहे. या वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाला मंजुरी मिळाल्याने वृत्तपत्र विक्रेत्यांना न्याय देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. याचे औचित्य साधुन गुरुवारी ठाण्यातील शासकिय विश्रामगृहात गेली सहा वर्षे यासाठी पाठपुरावा करणाऱ्या आमदार संजय केळकर यांचा ठाणे शहर वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनच्यावतीने जाहिर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी परिवहन सदस्य विकास पाटील, असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता घाडगे, वृत्तपत्र विक्रेते संजय सातार्डेकर, वैभव म्हात्रे, शरद पवार, समीर कोरे, दिलीप चिंचोले, संदीप अवारे , विवेक इसामे, भरत कुटे, सुरेश मस्करे, प्रदीप बिडलान, दिनेश भिंताडे, राजेंद्र सुर्वे, बंडू कदम, अजय मोरे, कृष्णा साळुंखे आणि गणेश शेडगे आदी उपस्थित होते.आ. केळकर यांनी यावेळी महायुती सरकार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धन्यवाद दिले.

कामाची पध्दत, कामाची वेळ, अत्यल्प उत्पन्न याचा विचार करता वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ करावी अशी मागणी आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांची एकमेव शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेसह विविध वृत्तपत्र विक्रेता संघटनानी सरकारकडे केली होती. आमदार केळकर यांनी तर अनेकदा हा प्रश्न विधीमंडळात मांडला होता. तत्कालीन मंत्री संभाजी पाटील यांच्याकडे दाद मागितल्यानंतर कामगार मंत्री सुरेश खाडे यांनाही साकडे घातले होते. त्यानंतर २०१८ च्या सुरुवातीला वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणकारी मंडळासाठी अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले होते. सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, गत अधिवेशनात याबाबत घोषणा केली होती, तर आज कॅबिनेट बैठकीत वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाला मंजुरी दिल्याने स्वप्न सत्यात उतरल्याचे आमदार संजय केळकर यांनी सांगितले.

महाराष्ट्रात अडीच लाख वृत्तपत्र विक्रेते आहेत तर देशभरात दीड ते दोन कोटी वृत्तपत्र आहेत. ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता इमानेएतबारे घरोघरी वृत्तपत्र पोहचवणाऱ्या या वृत्तपत्र विक्रेत्यांचे कल्याणकारी मंडळ होणे गरजेचे होते. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कुटुंबाच्या दृष्टीने मुलाबाळांच्या दृष्टीनेही महत्वाचे होते. यासाठी सातत्याने लढा सुरू होता. अखेर, महायुती सरकारने याला मंजुरी दिली असल्याने लवकरच याबाबतचा अध्यादेश काढण्यात येईल. असा विश्र्वास व्यक्त करून आमदार संजय केळकर यांनी, राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेत्यांचे तसेच अन्य राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांचे दुरध्वनी येत असल्याचे सांगितले.

# अनुसूचित जाती-जमाती राज्य आयोग सामाजिक न्यायासाठी कार्यरत - उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती - जमातीच्या वर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी जलदगतीने सोडविण्यासाठी आयोग कार्यरत आहे. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आयोग न्यायप्रक्रिया राबवित असल्याचे अनुसूचित जाती जमाती राज्य आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्याने राज्य आयोग समानता आणि सामाजिक न्यायासाठी कार्यरत आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याच्या आणि समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने अनेक योजना शासनाने अंमलात आणल्या आहेत. आयोगातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे कार्यरत असून प्रलंबित प्रकरणाचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी त्यांचे सहकार्य महत्वाचे आल्याचेही त्यांनी सांगितले.

उपाध्यक्ष मेश्राम म्हणाले की, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आज प्राप्त तक्रारीबाबत सुनावणी घेण्यात आली आहे. राज्य शासनाने आयोगासाठी केलेल्या निधीच्या तरतुदीचा समाजाला न्याय देण्यासाठी योग्य वापर केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अनुसूचित जाती जमाती संदर्भातील तक्रारी तसेच या प्रवर्गातील शासकीय सेवेतील कर्मचारी आणि अधिकारी यांनी https://sjsa.maharashtra.gov.in/en/maharashtra-state-commission-sc-st या संकेत स्थळावर आपल्या तक्रारींची नोंद करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अनुसूचित जाती/जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी स्विकारणे व तपास करणे. अनुसूचित जाती/जमातीचे कल्याण, आरक्षण, संरक्षण, विकास संबंधी इतर बाबी राज्य शासनाकडून ठरविण्यात येतील त्यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत आयोग कार्यरत आहेत.

राज्य आयोगाचे अध्यक्ष आनंदराज अडसूळ यांना राज्य मंत्रिपदाचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी राज्य शासनाचे आभार मानले. अनुसूचित जाती जमाती राज्य आयोगाकडे प्राप्त १५ तक्रारीवर आज वरळी येथील आरे दुग्ध शाळा इमारतीतील राज्य आयोगाच्या कार्यालयात सुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपाध्यक्ष श्री. मेश्राम बोलत होते. यावेळी पोलीस निरिक्षक सोनम पाटील, रमेश वळवी, संसदीय अधिकारी रत्नप्रभा वराडकर उपस्थित होते.

# आरोपीला निबंध लिहायला सांगणाऱ्या बाल न्याय मंडळाच्या अधिकाऱ्यांवर मोठी कारवाई

**पुणे/प्रतिनिधी :**पुण्यातील पोर्श कार अपघातप्रकरणातील मोठी अपडेट समोर आली आहे. राज्य सरकारने या प्रकरणात बाल न्याय मंडळाच्या दोन अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. पुण्यात मद्यधुंद अवस्थेत भरदाव वेगाने कार चालवत दुचाकीवरील दोघांना चिरडणाऱ्या अल्पवयीन मुलाला बाल न्याय मंडळाने ३०० शब्दांचा निबंध लिही आणि पोलिसांसह दोन आठवडे काम कर अशी अट घालत त्याचा जामीन मंजूर केला होता. या घटनेनंतर समाजमाध्यमांवर आणि महाराष्ट्रात चांगलाच संताप पाहायला मिळाला. त्यानंतर आरोपी मुलाला बालसुधारगृहात पाठवण्यात आलं. दरम्यान, आरोपीला ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची शिक्षा देणाऱ्या बाल न्याय मंडळाच्या दोन अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलं आहे. सत्तेचा गैरवापर केल्याच्या आरोपावरून राज्य सरकारने पुण्यातील बाल न्याय मंडळाच्या दोन राज्य-नियुक्त सदस्यांची हकालपट्टी केली आहे.

पुण्यातील कल्याणी नगर भागात मद्यधुंद अवस्थेत पोर्श कार चालवून अल्पवयीन मुलाने अश्विनी कोस्टा व अनिश अवधिया या दोघांना (दुचाकीवरून प्रवास करणारे तरुण व तरुणी) चिरडलं. ही घटना घडल्यानंतर तातडीने या मुलाला अटक करण्यात आली होती. मात्र, न्यायालयात हजर केल्यानंतर या मुलाला न्यायाधीशांनी ३०० शब्दांचा निबंध लिही, पोलिसांवर राहून वाहतुकीचे नियम समजून घेण्याची शिक्षा सुनावली होती. त्याचा जामीन मंजूर करताना ३०० शब्दांचा निबंध लिहून देण्याची अट घातली होती. या निंबधामध्ये अपघात घडल्यानंतर काय करायला हवे किंवा अपघात घडू नये म्हणून स्वत: काय काळजी घ्यायला हवी यावर निबंध लिहिणे आवश्यक होते. बालनिरीक्षणगृहातून बाहेर पडल्यानंतर अखेर अल्पवयीने मुलाने ३०० शब्दांचा निबंध बालहक्क मंडळकडे वकिलांमार्फत सादर केला.

नेमकी काय घटना घडली होती?

पुण्यातील प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिकाचा अल्पवयीन (साडेसतरा वर्षे) मुलगा दारूच्या नशेत मोटार चालवत होता. त्याने वाहतुकीचे नियम मोडत एका दुचाकीला धडक दिली. दुचाकीवरील तरुण अनिश अवधिया व त्याची मैत्रीण अश्विनी कोस्टा त्याच्या कारखाली चिरडले गेले. अश्विनी कोस्टा हिचा जागीच मृत्यू झाला; तर अनिश अवधिया याला स्थानिकांनी रुग्णालयात नेलं. मात्र, रुग्णालयात उपचारांदरम्यान अनिशचा मृत्यू झाला. या अपघाताच्या घटनेनंतर पुणे शहर पोलिसांनी आरोपीला अटक केली आणि सांगितले, ''या प्रकरणातला आरोपी अल्पवयीन आहे. या प्रकरणामध्ये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याविरोधात मोटार वाहन कायद्यातील कलमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणामध्ये अल्पवयीन मुलाचे वडील आणि ज्या बारचालकाने या मुलाला आणि त्याच्या मित्रांना मद्य दिले, त्यांच्याविरोधातही कलम ७५ व ७७ अंतर्गत कारवाई करण्यात आली. अल्पवयीन मुलाच्या वडिलांना काही दिवसांनी अटक करण्यात आली. बारचालकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला. या मुलाला वाचवण्यासाठी त्याच्या वडिलांनी व प्रशासनातील अनेकांनी प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे.

# २२ दिवसात सायबर भामट्याने गृहिणीकडून उकळले २५ लाख

## पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** टेलिग्रामवर घरबसल्या हजारो रुपये कमवण्याची संधी असल्याची थाप मारून सायबर भामट्यानी एका गृहिणीकडून २२ दिवसांमध्ये तब्बल २५ लाख ७२ हजार ९७८ रुपये उकळले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून आता या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहिणी सागर भुतडा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्या गृहिणी असून, त्यांचे पती खासगी कंपनीमध्ये नोकरीला आहेत. त्यांच्या टेलिग्राम ॲपवर २७ जून रोजी सकाळी १० वाजता नर्मदा नावाच्या अकाऊंटवरून पार्ट टाईम जॉबसाठी मेसेज आला. हॉटेलच्या बुकिंगचे टास्क पूर्ण केल्यास मोठ्या प्रमाणात घरबसल्या पैसे कमावल्या जातात असे आमिष दाखवण्यात आले, रोहिणी भुतडा यांना सायबर भामटे ऑनलाइन हॉटेल बुकिंगचा टास्क द्यायचे. रोहिणी यादेखील टास्क पूर्ण करायच्या. त्याबदल्या आरोपींनी सुरुवातीला त्यांना परतावा दिला. मात्र, मध्येच परतावा थांबवून आणखी पैसे कमावण्याची संधी असल्याचे आमिष दाखविले.

त्यासाठी त्यांना मोठी रक्कम गुंतवायला लावली. वेगवेगळी कारणे देत सायबर भामट्यांनी त्यांच्याकडून २५लाख उकळल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दिली.तर या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला तर अशा अमिषाला बळी पडू नये, किंवा कुठल्याही टास्क ऑनलाइन करण्या अगोदर त्याची खातर जमा करावी अशी माहिती पोलीस उपायुक्त नवनीत कावत यांनी दिली.

# बुलडाणा येथे विमानतळाची निर्मिती करावी

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांच्याकडे केली

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**बुलढाणा जिल्ह्याला ऐतिहासिक आणि पर्यटनाचा वारसा लाभलेला आहे या भौगोलिकस्थळांचा विकास होण्याच्या दृष्टिकोनातून बुलडाणा येथे विमानतळाची निर्मिती करावी अशी आग्रही मागणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांच्याकडे केली आहे

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात नवभारत निर्मितीचा कार्य सध्या सुरू आहे आज भारत हा जगाची तिसरी अर्थशक्ती म्हणून उदयास येत आहे देशांतर्गत रस्ते रेल्वे आणि हवाई वाहतुक या तिन्ही दळणवळणाच्या साधनांचा उपयोग नागरिकांना करता यावा या दृष्टिकोनातून देशपातळीवर काम सुरू आहे बुलढाणा लोकसभा मतदारसंघात जागतिक कीर्तीचे खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आहे राष्ट्रमाता जिजाऊ यांची जन्मभूमी बुलढाणा जिल्ह्यात आहे



शिवाय संत गजानन महाराज यांचं समाधीस्थळ असून आनंद सागर हे पर्यटक क्षेत्र आहे या धार्मिक अध्यात्मिक आणि पर्यटनस्थळाला भेटी देण्यासाठी देश विदेश आणि राज्यातील पर्यटक या ठिकाणाला भेटी देत असतात देश विदेशातील पर्यटकांच्यासाठी विमान सेवा ही जवळपास १२५ किलोमीटर दूर आहे त्या ठिकाणी पोचण्यासाठी किमान चार तास लागतात पर्यटकांच्या आणि बुलढाणा जिल्ह्याच्या विकासासाठी नवीन विमानतळाची आवश्यकता आहे बुलढाणा जिल्ह्यातील ऐतिहासिक धार्मिक आणि पर्यटक स्थळाचा विकस करण्याच्या दृष्टिकोनातून नवीन विमानतळाची निर्मिती बुलढाणा येथे करण्यात यावी अशी आग्रही मागणी केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आहे

# मेहकर येथे रावण दहनाची जय्यत तयारी ; २५ फूट रावणाच्या प्रतिकृतीचे होणार दहन

## विजयादशमीला होणार राम लक्ष्मण आणि हनुमानाची झाकी स्वरूपात दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** विजयादशमीनिमित्त दि.१२ ऑक्टोबर रोजी मेहकर शहरातील हरण टेकडी हनुमान मंदिराच्या परिसरामध्ये रावणदहन केले जाणार आहे. या विजयोत्सवाला अनेक वर्षांची परंपरा असून या वर्षीही ती कायम आहे. या वेळी २५ फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन फायर शो फटाक्याची आतिषबाजी तसेच श्री हनुमान मंदिर येथून राम लक्ष्मण आणि हनुमानाची विजय मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर रावण दहनाला रीतसर सुरुवात होणार आहे.या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व आ. संजय रायमुलकर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे अशी माहिती राजस्थानी मारवाडी मंडळ व रावण दहन उत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे. तसेच दसऱ्याच्या दिवशी शिलागंण खेळून एकमेकांना आपट्याची पाने अर्थात सोने देण्यात येते. याचवेळी दृष्टप्रवृत्तीचा नाश व्हावा, यासाठी प्रतिकात्मक रावणाचे दहन केले जाते. राजस्थानी मारवाडी मंडळ व रावण दहन उत्सव समिती मेहकर तर्फे दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. गणेशोत्सवापासूनच सणांचे दिवस सुरू होतात. त्यानंतर नवरात्र, दसरा आणि दिवाळी अशी सणांची रेलचेलच सुरू होते. शहरात विकासाचे पर्व यावा आणि दुष्टप्रवृत्तींचा नाश व्हावा, असेच या रावणदहनाच्या वेळी प्रत्येक मेहकर कराची इच्छा आहे.

### रावण दहनानंतर रंगीबेरंगी फटाक्यांची आतिषबाजी

रावणाची प्रतिकृती तयार झाल्यानंतर त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे फटाके भरण्यात येणार आहेत. खासकरून शोभेची असणारे फटाके त्यामध्ये भरण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. रावण दहनाच्यापूर्वी याठिकाणी रंगीबेरंगी फटाक्यांची आतिषबाजी केली जाणार आहे. या विजयोत्सवाला नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून बंदोबस्त करण्यात येणार आहे.



## विविध वृत्त...

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बुलढाण्यातील बॅनर मुळे चर्चेला उधान




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागलेले आहेत. त्या अनुषंगाने मागील काळापासून बॅनर वॉर बघायला मिळत आहे. आज पुन्हा बुलढाणा शहरात चौका चौकात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बॅनर लावण्यात आले असून त्यावर महाराष्ट्रासाठी झटला, बहुजनांसाठी राबला, म्हणूनच सामान्यांना भावला, अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले . त्यावर एका वयस्कर महिलेचे दर्शन घेत असताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो झळकत आहे.. या बॅनरची बुलढाणा शहरात सर्वत्र चर्चासुरूझालीय..

### अकोल्यात खदान पोलिसांनी केली एटीएमच्या बॅटरी चोरणाऱ्या टोळीला केले अटक




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरातील गौरक्षण रोडवरील सेटीं हाईट्स येथील एसबीआयच्या एटीएममधून चोरी गेलेल्या बॅटरीची तक्रार खदान पोलीस स्टेशन मध्ये दाखल होती. तर पोलिसांनी तपास सुरू ठेवत. आज खदान पोलिसांनी दोन आरोपीसह चार बॅटरी आणि एक फोर व्हीलर हस्तगत केली असुन त्यांच्या कडून १ लाख ७८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### २३ वन मजुरांचे १३ महिन्याचे वेतन अडकले, मुख्य वनरक्षक कार्यलयात प्रहारचे ठिय्या आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती येथील वडाळी वनपरिक्षेत्रातील पोहरा वर्तुळातील इंदला, चोरआंबा, पोहरा बिट मध्ये रोजंदारी पद्धतीने रोपवनाचे काम करणाऱ्या मजुर कामगारांना मागील १३ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. मजूर कामगारांनी वारंवार निवेदने व आंदोलनांचा इशारा देऊन ही त्यांना न्याय न मिळाल्याने आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वात उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांच्या दालनात एक ते दोन तासा पासून ठिय्या आंदोलन केल्या नंतर मजूर कामगारांना १५ ऑक्टोबर पर्यंत म्हणजेच मंगळवार पर्यंत मजुरांच्या खात्यात १३ महिन्याचे वेतन जमा करण्याच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## किनगाव जटुटु येथे मानव विकास कॅम्प शिबिर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील किनगाव जटुटु येथे मानव विकास कॅम्प शिबिर यशस्वी पार पडले बुधवार दिनांक ९.१०.२०२४ ला प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणी पिसा अंतर्गत उपकेंद्र किनगाव जटुटु येथे मानव विकास शिबिर राबविण्यात आले

या शिबिराचे उदघाटन किनगाव जटुटुचे प्रथम नागरीक सरपंच शारदाबाई माहाजन यांच्या हस्ते करण्यात आले ४८ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली तसेच ० ते ६ महीण्यांचे एकून ४१ बालकांची तपासणी बालरोग तज्ञ यांच्या कडुन करून घेण्यात आली शिबीराचे आयोजन डॉ.अमोल शिपे जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.बुलढाणा व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बालशेटवार मॅडम डॉ.वैभव मापारी वैधकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र शिवणी पिसा यांच्या मार्गदर्शना खाली मानव विकास शिबीर राबविण्यात आले.



शिबीर यशस्वीतेसाठी नारायण सानप आरोग्य सेवक पी.डी.चव्हाण आरोग्य सेवक झगरे,खडागळे ,सपकाळ,तसेच आशा गटप्रर्वतक व आशा सेवीका व प्राथमी केंद्राचे सर्व आरोग्य कर्मचारी यांनी परिश्रम घेतले श्रिमती राठोड ताई आरोग्य सेविका व श्रिमती अवसरमोल यांनी फार मोलाचे सहकार्य केले व शिबीर यशस्वी पार पडले

## अकोल्यात धनगर समाजाने महसूल विभागाकडून निर्गमित केलेल्या राजपत्रकाची होळी



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** आरक्षणासाठी धनगर समाज चांगलाच आक्रमक होत आहे. मुख्यमंत्र्यांनी आरक्षणासाठी लेखी आश्र्वासन देऊनही अंमलबजावणी होत नाही. असा आरोप करीत अकोल्यात धनगर समाजाने महसूल विभागाकडून निर्गमित केलेल्या राजपत्रकाची होळी केली आहे. तर अकोल्यातल्या जिल्हाधिकारी कार्यलयासमोर धनगर समाज बांधवांकडून या राज पत्रकाची होळी करण्यात आली. तर यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

तर चुकीच्या पद्धतीने राजपत्रक निर्गमित करण्यात आलं असल्याचाही त्यांनी आरोप केला आहे. तर आचारसंहिता पूर्वी आमचा विचार करावा, अन्यथा आम्ही तुमचं सरकार समुद्रात बुडवू असा इशारा धनगर समाजाने दिला आहे.

## तालुका स्वीप चमुने केली दुर्गोत्सव मंडळामध्ये मतदार जनजागृती

### शिक्षण विभाग पंचायत समिती भंडाराचा अभिनव उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**भंढारा/प्रतिनिधी :** मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती भंडारा येथील शिक्षण विभागातर्फे शंकर राठोड गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भंडारा यांच्या मार्गदर्शनामध्ये जी. एस. भोयर प्रभारी विस्तार अधिकारी, महेश जगनिक, अशोक भुरे दिलीप सिंगनजुडे, राजेश देशमुख, सोपचंद सिरसाम, संजय माने या तालुकास्तरीय चमूने ग्राम खोकरला टवेपार येथील दुर्गोत्सव उत्सवामध्ये स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती अभियान राबविला.

याप्रसंगी मतदारांना येणाऱ्या सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये आपला मतदानाचा हक्क बजावून मतदानाची टक्केवारी वाढविण्यात यावी असे आवाहन करण्यात आले.

सर्वांनी मतदार यादीमध्ये समाविष्ट असलेल्यांनी शंभर टक्के मतदान करावे, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.




### राज्यात १५ ऑक्टोबर रोजी साजरा होणार 'वाचन प्रेरणा दिन'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीही सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/ मंडळे, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. वाचन प्रेरणा दिनाच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत प्रसारमाध्यमांनी उचित दखल घेऊन त्यांना व्यापक प्रसिद्धी द्यावी. प्रसारमाध्यमांच्या कार्यालयात देखील वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात यावा, असे आवाहन मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले यांनी केले आहे.

## शहराध्यक्षपदी विजय सरकटे यांची नियुक्ती

### डोणगावमध्ये शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सक्रिय

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या डोणगाव शहराध्यक्षपदी येथील सामाजिक कार्यकर्ते विजय सुभाष सरकटे यांची पक्षाचे मेहकर तालुकाध्यक्ष दत्तात्रय कुंडलिकराव घनवट यांनी नुकतीच नियुक्ती केली आहे. या नियुक्तीचे पत्र त्यांना दि.१० ऑक्टोबर रोजी देण्यात आली आहे. आगामी होऊ वाटलेल्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पक्ष संघटन बळकट करण्यासाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मेहकर तालुका अध्यक्ष दत्तात्रेय पुंडलिकराव घनवट यांनी डोणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा राजकारणातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले विजय सुभाष सरकटे यांची डोणगाव शहराध्यक्षपदी निवड केली आहे. याबाबत नवनिर्वाचित शहराध्यक्ष विजय सरकटे यांना देण्यात आलेल्या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे की, आपण आपल्या सामाजिक कार्यातून पक्ष संघटन मजबूत करावे, त्याचबरोबर सर्वसामान्य पर्यंत पक्ष संघटन पक्ष संघटनाचे ध्येयधोरण पोहोचवून सर्वांना न्याय द्यावा अशी अपेक्षा केली आहे. तर नियुक्ती संदर्भात मत व्यक्त करताना विजय सुभाष सरकटे यांनी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ध्येयधोरण सर्वसामान्य पर्यंत पोहोचून पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे मत व्यक्त केले. या निवडीबद्दल विजय सरकटे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याचबरोबर आगामी होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये सुद्धा याचा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. यावेळी प्रदेश सचिव पंकज पळसकर जिल्हा उपाध्यक्ष अँड नरवाडे तालुकाध्यक्ष दत्ता पाटील घनवट, निसार अंसारी सह पदाधिकारी सहकारी उपस्थित होते.



